Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 4 | Jan. 2015
Available online at www.lbp.world

# महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह विचारांची प्रासंगिकता

**डॉ.बाबासाहेब गणपतराव देशमुख**
**शिवाजी कला, वणिज्य, व विज्ञानमहाविद्यालय कन्नड जि. औरंगाबाद.**

**प्रस्तावना :**

विसाव्या शतकाने जगाला दोन महाशक्ती दिल्या अणुबॉम्ब ही एक आणि गांधी ही दुसरी या आईनस्टाईनच्या वाक्यातील शक्तीचा अर्थ अणुशक्ती व शब्दशक्ती असा होतो यातील अणुशक्तीचा संबंध मानवी संहाराशी तर शब्दशक्तीचा संबंध ह्रदय परिवर्तनासी येतो आणि अणुसंहार थांबविण्याचे सामर्थ्य केवळ शब्दशक्तीत आहे. असा ही त्याचा अर्थ होतो. महात्मा गांधी हे 20 व्या शतकातील एक युग पुरूष होते ही गोष्ट आता साऱ्या जगाने मान्य केले आहे. गांधीजीनी केवळ राजकीय नव्हे तर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून राजकीय व सामाजिक परिस्थितीला अनुसरून विचार सिध्दांन्त मांडले गांधीजीच्या अगोदर आधुनिक भारतातील कोणत्याही विचारवंताचे त्यांच्या इतका सर्वस्पर्शी विचार केलाहोता असे दिसत नाही. धर्म, नीती, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, आरोग्य, कायदा शेती कुटीरोद्योग किंवा मानवी जीवनाशी निगडीत कोणतेही क्षेत्र असो. वैयक्तिक आत्मशांतीपासून विश्वशांतीपर्यंत गावापासून विश्वापर्यत प्रचंड मोठ्या प्रमाणात आवाका गांधी विचाराने व्यापलेला आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे कृतीशील नेते सत्याला साध्य मानणारे व अहिंसेला साधन मानुन सत्याग्रह या अहिंसक हत्याराचे प्रयोग करणारे व संपूर्ण विश्वाला सत्य, अहिंसा व शांतीचा संदेश देणारे प्रणेते भारतीय संस्कृती आणि परंपरा यांचे चिकित्सक अभ्यासक,देशासाठी सर्वस्वाचा त्याग करणारे देशभक्त इत्यादी अनेक नावांनी गांधीजी प्रत्येक भारतीयालाच नव्हे तर जगातील इतर लोकांनाही परिचित आहेत.

आपण जीवन जगत असलेल्या सामाजिक राजकीय, अर्थिक, सांस्कृतिक, तांत्रिक, मानसिक, भावनिक आणि बौध्दीक अशा विविध क्षेत्रातील समस्या पहिल्यानंतर अंतकरणातुन एक आवाज येतो, आज गांधीजी हवेतच. गांधीजी म्हणजे सत्य, अहिंसा, सत्याग्रह नीती, सदाचार ज्याची आजच्या युगाला ऑक्सीजन प्रमाणे गरज आहे.जागतिकीकरणाच्या, विज्ञानाच्या, तसेच चंगळवादाच्या पार्श्वभूमीवर गांधीजीच्या सत्याग्रहाचा विचार कालबाह्य झाला आहे. असे म्हटले जाते, पण हे वास्तवाला अनुसरून आहे. असे वाटत नाही, त्याचे कारण म्हणजे आज राष्ट्रा–राष्ट्रातील वाढती अण्वस्त्र स्पर्धा, शक्तीची व युध्दाची भाषा, द्वेष, हिंसा, सांप्रदायिक दंगली व जगभर दहशतवादाने घातलेले थैमान तसेच भष्ट्राचार या सर्व पार्श्वभूमीवर जगाला कधी नव्हती एवढी गांधीजीच्या सत्याग्रहाच्या विचारांची गरज वाटत आहे.

गांधीजीचा सत्याग्रहाविषयक विचार त्याच्या काळात मार्गदर्शक होतोच किंबहुना त्यापेक्षाही आज अधिक गरजेचा किंवा निकडीचा आहे.

गांधीजीनी दिलेले हे सत्याग्रहाचे हत्यार आजच्या संदर्भात कालबाह्य न ठरता अभिनव स्वरूपाचे आहे. महात्मा गांधीजीची सत्याग्रह संकल्पना वर्तमान काळातील समस्यांना तोंड देण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकते महात्मा गांधी सत्याग्रहाविषयक विचारात व्यापक जनहिताला महत्व देतात.वर्तमान काळातील तसेच जीवनाच्या सर्व क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी महात्मा गांधीजीच्या सत्याग्रहाचे विचार संपुर्ण मानव जगताला मार्गदर्शक ठरू शकतात.

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात गांधीजीनी अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठीसत्याग्रहाचा यशस्वीरित्या प्रयोग केला.संपूर्ण मानव जातीला गांधीजीनी सर्वात मोठे मुल्य दिले ते म्हणजे सत्य व अहिंसा हे साध्य व साधन असणारे सत्याग्रह नावाचे शस्त्र होय. जे स्वराज्यासाठी सत्याग्रह महत्वाचे साधन होत. तेच साधन मानवाच्या अस्तित्वासाठी तेवढेच महत्वाचे आहे सत्याग्रह हा अन्यायाच्या विरोधात अहिंसात्मक पध्दतीने युध्द करण्याचा एक मार्ग आहे. सत्याग्रहाचा शाब्दीक अर्थ सत्यासाठी आग्रह असाहोतो. गांधीजीच्या मते स्वतः आत्मक्लेश सहन करून दुसऱ्याचे हृदय परिवर्तन घडवून आणणे म्हणजे सत्याग्रह होय. सत्याग्रहामध्ये सत्य व अहिंसा या दोन तत्वाचा समावेश आहे.

गांधीजीच्या सत्याग्रह या संकल्पनेवरून हिंसेचा अहिंसेने, अविवेकाचा–विवेकाने, अन्यायाचा–न्यायाने, अमाणुसकीचा माणुसकीने प्रतिवाद करणे हा गांधी प्रणित संघर्ष निवारण्याचा आणि शांतता प्रस्थापनेच्या सत्याग्रह तंत्राचा गाभा आहे असे म्हणता येईल. गांधीजीच्या राजकीय विचारात सत्याग्रहाला सर्वश्रेष्ट स्थान आहे.त्यांच्या सत्याग्रहाच्या कल्पनेत इतरांना कष्ट देण्याची भावना नसून स्वतः कष्ट सहन करून इतरांचे हृदय परिवर्तन घडवून आणण्याचे तत्व सामाजिष्ठ आहे. गांधीजीच्या मते सत्याग्रह हे– सत्याग्रह ही दुधारी तलवार आहे ती कशीही वापरता येते ती वापरता स्वतः आणि ज्याच्यावर ती वापरली जाते तो अशा दोघांचेही त्यामुळे कल्याण होत. ती रक्त सांडीत नाही पण परिणाम मात्र फार मोठा करते.

सत्याग्रह म्हणजे अन्याय दडपशाही आणि शोषण यांच्या विरूध्द केलेला आत्मीक शक्तीचा वापर होय. गांधीजीच्या मते हिसेशिवाय लढाई जिंकता येते हे करणे हेच सत्याग्रहाचे कार्य आहे. सत्याग्रहाचा उपयोग फक्त सामाजिक हितासाठीच केला जातो. व्यक्तिगत स्वार्थासाठी कदापि केला जात नाही कारण सत्याग्रह हा केवळ समाजहिताच्या दृष्टीने करावा लागतो व तो नैतिक तत्वावर आधारित सत्याग्रह करण्यात आला पाहिजे प्रेमा कटक याच्या मते सत्याग्रह ही बहुजन समाजाची चळवळ नसेल तर ती प्रभावी ठरत नाही. गांधीजीच्या मते सत्याग्रहीने पूर्ण विचार करूनच सत्याग्रहात सहभागी व्हायचे आहे क्षणिक आवेशात किंवा भावनेच्या आहारी जाऊन बहूतेक जण शपथ घेतील, विचारपूर्वक दृढनिश्चय असेल तरच प्रतिज्ञा करा. सत्याग्रहीचे आचरण कसे असावे. या संदर्भात गांधीजीचे सत्याग्रहीविषयीचे विचार लक्षात घेणे गरजेचे आहे.

1. सत्याग्रहीची ईश्वरावर नितांत श्रध्दा असावी.
2. अहिंसा सत्य आणि माणसाच्या मुलभूत चांगुलपणावर त्याचा विश्वास असला पहिजे.
3. सत्याग्रहीचे जीवन विशुध्द असावे आणि ध्येयासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी असावी.
4. तो नियमाने सूत कातणारा आणि खादी वापरणारा असावा.
5. निर्व्यसनी असला पहिजे आत्मक्लेश सहन करण्याची सिध्दता असावी.
6. वेळोवेळी घालून दिलेले शिस्तीचे नियम पाळले पहिजेत.
7. त्याच्या स्वाभीमानालाधक्का बसत नाही तो पर्यत त्याने तुरूगांचे नियम पाळले पाहिजेत.

गांधीजीच्या मते जो सत्याग्रही आपल्या कार्याच्या प्रति एकनिष्ठ राहतो तोच निष्ठावंत सत्याग्रही म्हणून ओळखला जातो. अन्यायाचा प्रतिकार हा अहिंसक मार्गाने झाला पहिजे असा कटाक्ष गांधीजीचा होता.त्यांनी सत्याग्रहाची विविध साधने विकसित केली. अन्याय करणारा व अन्याय सहन करणारा तेवढेच जबाबदार असतात. म्हणून भारतीय जनतेने अहिंसक प्रतिकारक सज्ज झाले पाहिजे. गांधीजीनी जी सत्याग्रहाची तंत्रे

भारतीय समाजाला अन्यायी व अत्याचारी शासनाच्या विरोधात प्रतिकार करण्यास दिली ती आजही जेव्हा–जेव्हा अन्याय, अत्याचार, शोषणावर आधारित कायदे व व्यक्तीच्या मूलभूत अधिकारावर आक्रमण केले जाते तेव्हा पुढील अहिंसक तंत्राचा गरजेप्रमाणे वापर केला जातो.1. असहयोग 2.सविनय कायदेभंग 3. हरताळ 4. बहिष्कार 5. धरणे 6. उपोषण 7. हिजरत 8. निरोधन, गांधीजीनी या सत्याग्रह साधनांच्या आधारे ब्रिटिश सत्तेशी सतत संघर्ष करून भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्याच बरोबर हिंसेशिवाय शास्त्राशिवाय, लढाई जिंकता येते हेकृतितुन दाखवून दिले.

आज बदलत्या राजकीय सामाजिक आणि अर्थिक तसेच जीवनाशी निगडीत असलेल्या क्षेत्रातील झालेल्या अनैतिक परिवर्तनामुळे गांधीजीच्या सत्याग्रहाविषयी शंका व्यक्त केली जाते पण स्वतंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात ही गांधीजीच्या सत्याग्रहाविषयक विचार केवळ भारतालाच नव्हे तर संपूर्ण अखिल मानव जातीला दिशादर्शक आहेत याची प्रचिती म्हणजे आपल्याला भारताला व बाह्म जगतात सत्याग्रहया तंत्राचा प्रयोग होतानादिसतो.

सत्याग्रह नावाच्या शस्त्राने आता देशाच्या सीमा ओलाडल्या आहेत जगभराच माणसाचे ते विश्वसनीय व यशदायी हत्यार बनले आहे. अन्याचा प्रतिकार करणसाठी गांधीजीनेजोमार्ग सांगितला तो भारतीय जनतेने स्वातंत्र्य लढयात तर उपयोगात आणलाच पण गांधीजीच्या सत्याग्रह मार्गाचा अवलंब जगात अनेक देशातील जनतेने केला. आजच्या काळामध्ये किंवा परिस्थितीमध्ये गांधीजीच्या सत्याग्रह या तंत्राचा उपयोग काही स्वार्थी लोक हे स्वहितासाठीव सत्ता प्राप्तीसाठी करतात ते समाज व राष्ट्रहिताच्या पूरक नाही. गांधीच्या पश्चात उपोषणाच्या मार्गाचे फार अवमुल्यन झाले आहे हे कबुल करावेलागेल उपोषण आता कोणीही कशासाठी करतो, सहा तासाचे चक्री असे उपोषणाचे मार्ग केवळ प्रसिध्दीसाठीलोकांनी शोधले आहेत.

गांधीचा मुळ विचार लक्षात घेऊन केलेले उपोषण वाया जात नाही.मेघा पाटकर, अरूणा रॉय, सुंदरलाल बहूगुणा, अण्णा हजारे या सारख्या तत्वनिष्ठानी सिध्द केले आहे यांनी केलेल्या कार्यावरून महात्मा गांधीजीच्या सत्याग्रह या शस्त्राची प्रासंगिकता आजही आहे उद्या ही राहणार आहे.

महात्मागांधीचेहे सत्याग्रहाचे तत्व केवळ व्यक्तिीच्या मोक्ष साधनेचे तत्व नाही ते भिन्नभिन्न समाजाच्या आणि राष्ट्राच्या आत्मोद्वाराच्या सामुदायिक साधनेचे तत्व आहे. जगातील सगळी मानव जात बंधनमुक्त व्हावी आणि एक उन्नत असा मानव समाज स्थापण व्हावा असे कम्युनिष्ठ विचारसरणीचे अंतिम उद्‌दीष्ट आहे. परंतु आज जगातील समाजवादी व साम्यवादी राष्ट्र अत्यंत घातक आणि मानव जातीला संपुर्ण नाश होऊ शकेल अशा तऱ्हेच्या युध्दाची तयारी करीत आहे. रशिया चीन आणि पूर्ण युरोपमध्ये साम्यवाद क्रांती झाली आहे आणि ही साम्यवादी राष्ट्रे अणुयुध्दाच्या तयारीला गुंतली आहेत ब्रिटन, फ्रान्स इत्यादी पश्चिम युरोपातील राष्ट्र आणि युनाटेड स्टेट्स ऑफ अमेरिका अणुयुध्दात विजय मिळवण्यासाठी शस्त्रास्त्राचा साठा करीत आहे यापुढील जागतिक युध्दात सगळी मानवजात आणि प्राणिसृष्टी नष्ट होण्याचा धोका आहे या धोक्यातून मानवजात एकाचमार्गाने वाचू शकेल तो म्हणजे महात्मा गांधीचा सत्याग्रहाचामार्ग होय. या एकवियाव्या शतकातील उच्च ध्ययवादी क्रांतीचे मार्ग मानव जातीला तारू शकणार नाहीत. महात्मा गांधीच्या सत्याग्रहाचा मार्गच एकमेवमानवजातीला तारू शकेल.

## संदर्भसुचीः


1. गांधी मो.क.(सारसंक्षंप व समालोचन, क्रांतीशाह व वसंत पलशीकर) हिंद– स्वराज्य का संदेश मंत्री सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठान, सेवाग्राम वर्धा, प्र.आं.1992
2. गांधी मो.क. हिंद स्वराज्य, नवजीवन प्रकाशन मंदीर अहमदाबाद1958
3. पाटील बी.बी. भारतीय राजकीय विचारवंत फडके प्रकाशन कोल्हापुर, 1998
4. ताटके अरविंद, महात्मा गांधी (पर्व1ते 9) सरीता प्रकाशन सेनापती बापट मार्ग, पुणे, 01.02.1994
5. गोखले द.न. गांधीजी मानव नि महामानव, मौजे प्रकाशन ग.ह. खटववाडी, गिरगाव, मुंबई
6. भोळे भा.ल. आधुनिक भारतातील राजकीय विचार पिपंळापुरे प्रकाशन नागपुर, प्रकाशन नागपुर प्र. आ. 2005

7. मन्नानारायण (सं.पा.) द सिलेक्टेड वर्क ऑफ महात्मा गांधी सत्याग्रह इनसाऊथ आफ्रिका, खंड– 3,1986
8. गांधी मो. क. दी साईन्स ऑफ सत्याग्रह, भारतीय विद्याभवन मुंबई, 1957
9. लोकराज्य, (महात्मा माणुसकीची मशाल–विशेषांक) अक्टुबर, 2010